# राज्याचा हवामान, पिक पेरणी व पिक परिस्थितीचा दिनांक १२/०८/२०२४ अखेरचा खरीप हंगाम २०२४-२५ चा साप्ताहिक अहवाल.

- **हवामान** : राज्यात अहवाल कालावधीत बहुतांश विभागात आकाश ढगाळ होते. कोंकण विभागात बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या तर तुरळक ठिकाणी जोरदार स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली. नाशिक, पुणे, कोल्हापूर, छत्रपती संभाजीनगर, लातूर व अमरावती विभागात काही ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या तर नागपूर विभागात बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.

- **खरीप हंगाम-२०२४-२५ :**

- **पिक परिस्थिती :**

राज्यात खरीप पिकांचे सरासरी क्षेत्र (ऊस वगळून) १४२.०२ लाख हेक्टर असून दि.१२ ऑगस्ट, २०२४ अखेर १४१.९५ लाख हेक्टर क्षेत्रावर (१००%) पेरणी झाली आहे. तसेच राज्यात खरीप पिकांचे ऊस पिकासह सरासरी क्षेत्र १५२.९७ लाख हेक्टर असून १४३.६५ लाख हेक्टर क्षेत्रावर (९४%) पेरणी/लागवड झाली आहे. मागील वर्षी दि.१४.०८.२०२३ रोजी संपणाऱ्या सप्ताहाअखेर राज्यातील ऊस पिकासह पेरणी क्षेत्र १३८.७५ लाख हे. (सरासरीशी ९१%) तर ऊस पिक वगळून पेरणी क्षेत्र १३६.३३ लाख हे. (सरासरीशी ९६%) होते.

- भात व नाचणी पिकांच्या पुर्नलागवडीची कामे अंतिम टप्प्यात आहेत.
- पुर्नलावगड झालेले भात व नाचणी पिके रोपे, वाढीच्या ते फुटवे फुटणेच्या अवस्थेत आहेत.
- ज्वारी, बाजरी, मका, सोयाबीन, तूर, उडीद, मूग, भुईमूग, कापूस पिकांच्या पेरण्या अंतिम टप्प्यात आहेत.
- ज्वारी, बाजरी पिके वाढीच्या ते फुटवे फुटणे अवस्थेत आहे.
- मूग, उडीद पिके शाखीय वाढ ते फुलोरा अवस्थेत आहे.
- सोयाबीन पिक फुलोरा अवस्थेत आहे.
- कापूस पिक फुलपाते लागणेच्या अवस्थेत आहे.
- तूर पिक फुटवे फुटणे ते वाढीच्या अवस्थेत आहे.
- नवीन आडसाली ऊसाची लागण सुरु असून हंगामी, मागील वर्षाच्या सुरु व खोडवा ऊसामध्ये आंतरमशागतीची कामे सुरु आहेत.
- पिक परिस्थिती समाधानकारक आहे.
- राज्यात कोकण, पुणे, कोल्हापूर, नागपूर विभागात काही ठिकाणी अतिवृष्टीमुळे शेत व फळपिकांचे नुकसान झाले आहे.

**पर्जन्यमान (२०२४)**

दि.१ जून ते १२ ऑगस्ट, २०२४ या कालावधीमधील राज्यातील सरासरी पाऊस ६४९.२ मि.मी. असून दि.१२ ऑगस्ट, २०२४ पर्यंत ७९९.८ मि.मी. म्हणजेच सरासरीच्या १२३.२ टक्के पाऊस झाला. मागील वर्षी दि.१२.०८.२०२३ अखेर ६०७.५ मि.मी. म्हणजेच सरासरीच्या ९३.६ टक्के पाऊस झाला.

राज्यात दि.१ जून ते दि.१२ ऑगस्ट, २०२४ अखेरीस सरासरीच्या तूलनेत प्रत्यक्ष पडलेल्या पावसानुसार (प्रागतिक) जिल्ह्याची वर्गवारी खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | पर्जन्यमान टक्केवारी | जिल्हे संख्या | जिल्ह्यांची नावे |
|---|---|---|---|
| १ | ० ते २५ % | ० | ---- |
| २ | २५ ते ५० % | ० | ---- |
| ३ | ५० ते ७५ % | ० | ---- |
| ४ | ७५ ते १०० % | ३ | नाशिक, कोल्हापूर, हिंगोली. |
| ५ | १०० % पेक्षा जास्त | ३१ | ठाणे, रायगड, पालघर, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, नंदुरबार, जळगांव, धुळे, पुणे, अहमदनगर, सोलापूर, सातारा, सांगली, छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, लातूर, धाराशिव, नांदेड, परभणी, बुलढाणा, अकोला, वाशिम, अमरावती, यवतमाळ, वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली. |

राज्यात दि.१२ ऑगस्ट, २०२४ अखेर पर्जन्यमान सरासरीच्या तूलनेत एकूण ३५५ तालूक्यांपैकी ० तालूक्यात ० ते २५%, ० तालुक्यात २५ ते ५०%, ३ तालुक्यात ५० ते ७५%, ४७ तालूक्यात ७५ ते १००% तर ३०५ तालूक्यात १०० % पेक्षा जास्त पाऊस झाला आहे.

**❖ नैसर्गिक आपत्ती :**

दि.०६ ऑगस्ट, २०२४ च्या प्राथमिक नजरअंदाज अहवालानुसार माहे, जुलै-२०२४ मधील पावसामुळे शेती व फळपिकांचे नुकसान झाले आहे. यामध्ये १४९०२७.१८ हे. क्षेत्र बाधित झाले आहे. तर जमीन खरडून गेलेले क्षेत्र ५००.३३ हे. आहे.


**❖ किड व रोग :**

राज्यात काही ठिकाणी सोयाबीन पिकावर तंबाखुवरील पाने खाणारी अळी, उंट अळी, खोडमाशीचा, चक्रीभुंगा, कापूस पिकावर मावा तुडतुडे, भात पिकावर पिवळया खोडकिडीचा, पिवळा मोझॅक, मूग, उडीद पिकावर पाने खाणाऱ्या अळीचा, मका व ज्वारी पिकावर लष्करी अळीचा अल्प प्रमाणात प्रादुर्भाव आढळून येत आहे.


किडरोग व्यवस्थापनासाठी क्षेत्रिय स्तरावर शेतीशाळा, कृषि विद्यापीठांकडील पिक संरक्षण सल्ले, सर्वेक्षणासाठी फेरोमेन सापळे व ल्युर्सचा पुरवठा तसेच जैविक किटकनाशकांच्या वापराबाबत सूचना इत्यादी उपाययोजना करण्यात येत आहेत. तसेच त्याबाबत जनजागृती करण्यात येत आहे.

**खरीप हंगाम सन-२०२४-२५ मधील राज्यस्तरीय पेरणी क्षेत्र (लाख हे.) व टक्केवारी**

(दि.१२ ऑगस्ट, २०२४ अखेर)



## खरीप हंगाम सन-२०२४-२५ मधील पिकनिहाय पेरणी क्षेत्राचा सरासरी पेरणी क्षेत्राशी तुलनात्मक तक्ता (दि.१२ ऑगस्ट, २०२४ अखेर)




## विभाग निहाय पिक परिस्थिती

### कोकण विभाग खरीप हंगाम

- **हवामान** : अहवाल कालावधीत बहुतांश ठिकाणी आकाश ढगाळ होते. विभागात बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या तर तुरळक ठिकाणी जोरदार स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली आहे.
- **पिक पेरणी** : विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र ४.१४ लाख हेक्टर असून, दि.१२ ऑगस्ट, २०२४ अखेर ३.४६ लाख हेक्टर क्षेत्रावर (८४%) पेरणी झाली आहे.
- **पिक परिस्थिती** :
  - भात व नाचणी पिकांच्या पुर्नलागवडीची कामे अंतिम टप्प्यात आहेत.
  - पुर्नलागवड झालेले भात व नाचणी पिके रोपे, वाढीच्या ते फुटवे फुटणेच्या अवस्थेत आहेत.
  - तूर, मूग, उडीद, तीळ, कारळे या पिकांच्या पेरणीची कामे पुर्ण झाली आहेत.
  - जुलै महिन्यातील सततच्या मुसळधार पावसामुळे भात पिक रोपे कूजणे, शेतात गाळ साचणे तसेच फळपिकांचे नुकसान झाले आहे.
- **किड व रोग** : निरंक.

### नाशिक विभाग खरीप हंगाम

- **हवामान** : अहवाल कालावधीत बहुतांश ठिकाणी आकाश ढगाळ होते. विभागात काही ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.
- **पिक पेरणी** : विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र २०.६५ लाख हेक्टर असून, दि.१२ ऑगस्ट, २०२४ अखेर २०.३९ लाख हेक्टर क्षेत्रावर (९९%) पेरणी झाली आहे.
- **पिक परिस्थिती** :
  - भात पिकाच्या पुर्नलागवडीची कामे अंतिम टप्प्यात आहेत.
  - पुर्नलागवड झालेले भात पिक वाढीच्या ते फुटवे फुटणेच्या अवस्थेत आहेत.
  - ज्वारी व बाजरी पिके वाढीच्या ते फुटवे फुटणेच्या अवस्थेत आहे.
  - मूग, उडीद, सोयाबीन पिके फुलोरा ते वाढीच्या अवस्थेत आहे.
  - भुईमूग पिक फांदया फुटणे ते आऱ्या सुटणेच्या अवस्थेत आहे.
  - इतर पेरणी झालेली पिके रोप ते वाढीच्या अवस्थेत असून पिकांमध्ये आंतरमशागतीची कामे सुरु आहेत.

- कापूस पिक फुलपाते लागणेच्या अवस्थेत तर काही ठिकाणी बोंडे लागणेच्या अवस्थेत आहे.
- आडसाली ऊसाची लागण सुरु असून हंगामी, मागील वर्षीच्या सुरु व खोडवा ऊस वाढीच्या अवस्थेत असून ऊसामध्ये आंतरमशागतीची कामे सुरु आहेत.

❖ **किड व रोग :**

विभागात काही ठिकाणी कापूस पिकावर गुलाबी बोंड अळीचा, मका पिकावर लष्करी अळीचा अल्प प्रमाणात प्रादुर्भाव आढळून येत आहे.

## पुणे विभाग खरीप हंगाम

❖ **हवामान** : अहवाल कालावधीत बहुतांश ठिकाणी आकाश ढगाळ होते. विभागात काही ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली आहे.

❖ **पिक पेरणी :** विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र १०.६५ लाख हेक्टर असून, दि.१२ ऑगस्ट, २०२४ अखेर १४.२४ लाख हेक्टर क्षेत्रावर (१३४%) पेरणी झाली आहे.

❖ **पिक परिस्थिती :**

- भात व नाचणी पिकांच्या पुर्नलागवडीची कामे अंतिम टप्प्यात आहेत.
- पुर्नलागवड झालेले भात व नाचणी पिके फुटवे फुटणेच्या अवस्थेत आहेत.
- बाजरी पिक वाढीच्या ते फुटवे फुटणे अवस्थेत आहे.
- मूग, उडीद पिके फुलोरा अवस्थेत आहे.
- सोयाबीन पिक फुलोरा अवस्थेत आहे.
- तूर पिक फुटवे फुटणेच्या अवस्थेत आहे.
- तीळ, सुर्यफुल पिके वाढीच्या अवस्थेत आहे.
- पेरणी झालेली इतर पिके रोप ते वाढीच्या अवस्थेत आहेत.
- विभागात अतिवृष्टीमुळे शेतीपिकांचे नुकसान झाले आहे.

❖ **किड व रोग :**

विभागात काही ठिकाणी सोयाबीन पिकावर उंट अळी, कापूस पिकावर गुलाबी बोंड अळी, मावा तुडतुडे, मूग, उडीद पिकावर पाने खाणाऱ्या अळीचा, मका पिकावर लष्करी अळीचा अल्प प्रमाणात प्रादुर्भाव आढळून येत आहे.

## कोल्हापूर विभाग खरीप हंगाम

❖ **हवामान** : अहवाल कालावधीत बहुतांश ठिकाणी आकाश ढगाळ होते. विभागात काही ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली आहे.

❖ **पिक पेरणी :** विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र ७.२८ लाख हेक्टर असून, दि.१२ ऑगस्ट, २०२४ अखेर ७.१९ लाख हेक्टर क्षेत्रावर (९९%) पेरणी झाली आहे.

❖ **पिक परिस्थिती :**

- खरीप हंगामातील पेरण्या पुर्णत्वाकडे आहेत.
- भात व नाचणी पिकांच्या पुर्नलागवडीची कामे पुर्ण झाली आहेत.

- पुर्नलागवड झालेले भात व नाचणी पिके वाढीच्या, फुटवे फुटणे ते पोटरीच्या अवस्थेत असून, पिकांमध्ये आंतरमशागतीची कामे सुरु आहेत.
- ज्वारी पिक वाढीच्या अवस्थेत आहे.
- बाजरी पिक फुटवे फुटणे ते पोटरीच्या अवस्थेत आहे.
- भुईमूग, सोयाबीन पिके शाखीय वाढ ते फुलोरा अवस्थेत आहे.
- मूग, उडीद पिके फुलोरा ते शेंगा लागणेच्या अवस्थेत आहे.
- मका व तूर पिक वाढीच्या अवस्थेत आहे.
- नवीन आडसाली ऊसाची लागण सुरु आहे. गळीतास जाणारा ऊस वाढीच्या अवस्थेत आहे.
- विभागात काही ठिकाणी अतिवृष्टीमुळे नदी लगतच्या भागामध्ये भात व इतर पिकांचे नुकसान झाले आहे.

❖ **किड व रोग :**

विभागात काही ठिकाणी ज्वारी व मका पिकावर लष्करी अळीचा अल्प प्रमाणात प्रादुर्भाव आढळून येत आहे.

## छ.संभाजीनगर विभाग खरीप हंगाम

❖ **हवामान** : अहवाल कालावधीत बहुतांश ठिकाणी आकाश ढगाळ होते. विभागात काही ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली आहे.

❖ **पिक पेरणी :** विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र २०.९० लाख हेक्टर असून, दि.१२ ऑगस्ट, २०२४ अखेर २०.५० लाख हेक्टर क्षेत्रावर (९८%) पेरणी झाली आहे.

❖ **पिक परिस्थिती :**

- विभागात खरीप हंगामातील बाजरी, मका, सोयाबीन, तूर, उडीद, मूग, कापूस, भूईमूग पिकांच्या पेरण्या पुर्णत्वाकडे आहेत.
- भुईमूग पिक शाखीय वाढीच्या ते फुलोरा लागणेच्या अवस्थेत आहे.
- सोयाबीन पिक वाढीच्या ते फुलोरा अवस्थेत आहे.
- मूग, उडीद पिके फुलोरा ते शेंगा लागणेच्या अवस्थेत आहे.
- मका पिक वाढीच्या ते तुरे लागणेच्या अवस्थेत आहे.
- बाजरी पिके फुटवे फुटणे, वाढीच्या ते कणसे लागणेच्या अवस्थेत आहे.
- तूर पिक शाखीय वाढीच्या अवस्थेत आहे.

❖ **किड व रोग :**

विभागात काही ठिकाणी उडीद पिकामध्ये मावा किडीचा, सोयाबीन पिकावर चक्रीभुंगा, पाने खाणारी अळी, खोडमाशी, उंट अळी, पाने गुंडाळणारी अळी, कापूस पिकावर गुलाबी बोंड अळी, रस शोषणाऱ्या किडींचा, मका पिकावर लष्करी अळीचा अल्प प्रमाणात प्रादुर्भाव आढळून येत आहे.

## लातूर विभाग खरीप हंगाम

❖ **हवामान** : अहवाल कालावधीत बहुतांश ठिकाणी आकाश ढगाळ होते. विभागात काही ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली आहे.

❖ **पिक पेरणी :** विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र २७.६७ लाख हेक्टर असून, दि.१२ ऑगस्ट, २०२४ अखेर २७.६५ लाख हेक्टर क्षेत्रावर (१००%) पेरणी झाली आहे.

- **पिक परिस्थिती :**
  - विभागात खरीप हंगामातील ज्वारी, बाजरी, मका, सोयाबीन, तूर, उडीद, मूग, कापूस पिकांच्या पेरण्या अंतिम झाल्या आहेत.
  - मूग, उडीद पिके फुलोरा अवस्थेत आहे.
  - तूर पिक फांदया फुटणे ते वाढीच्या अवस्थेत आहे.
  - ज्वारी, बाजरी पिके फुटवे फुटणेच्या अवस्थेत आहे.
  - सोयाबीन पिक फांदया फुटणे ते फुलोरा अवस्थेत आहे.
  - कापूस पिक वाढीच्या अवस्थेत आहे.
  - मागील सप्ताहात झालेल्या सततच्या पावसामुळे सकल भागातील पिके काही अंशी पिवळी पडली आहेत.

- **किड व रोग :**

  विभागात काही ठिकाणी सोयाबीन पिकावर चक्रीभुंगा, तंबाखुवरील पाने खाणाऱ्या अळीचा, पिवळा मोझॅक, उंट अळी, कापूस पिकावर रस शोषणाऱ्या किडींचा, गुलाबी बोंड अळी, मका पिकावर लष्करी अळीचा अल्प प्रमाणात प्रादुर्भाव आढळून येत आहे.

## अमरावती विभाग खरीप हंगाम

- **हवामान** : अहवाल कालावधीत बहुतांश ठिकाणी आकाश ढगाळ होते. विभागात काही ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली आहे.

- **पिक पेरणी :** विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र ३१.५९ लाख हेक्टर असून, दि.१२ ऑगस्ट, २०२४ अखेर ३०.८५ लाख हेक्टर क्षेत्रावर (९८%) पेरणी झाली आहे.

- **पिक परिस्थिती :**
  - विभागात खरीप हंगामातील मका, ज्वारी, मूग, उडीद, तूर, सोयाबीन, कापूस पिकांच्या पेरण्या अंतिम टप्प्यात आहेत.
  - मूग, उडीद पिके शाखीय वाढीच्या ते फुलोरा अवस्थेत आहे.
  - ज्वारी पिक वाढीच्या अवस्थेत आहे.
  - मका पिक वाढीच्या अवस्थेत आहे.
  - तूर पिक वाढीच्या अवस्थेत आहे.
  - कापूस पिक शाखीय वाढीच्या अवस्थेत असून पिकांमध्ये आंतरमशागतीची कामे सुरु आहेत.
  - सोयाबीन पिक फांदया फुटणे ते फुलोरा अवस्थेत आहे.
  - सततच्या पावसामुळे काही ठिकाणी पिके पिवळी पडत आहेत.

- **किड व रोग :**

  विभागात काही ठिकाणी सोयाबीन पिकावर चक्रीभुंगा, खोडमाशी, तंबाखुवरील पाने खाणाऱ्या अळी, उंट अळी या किडींचा, तूर पिकावर मर रोगाचा, मूग, उडीद पिकावर रस शोषणाऱ्या किडींचा, कापूस पिकावर गुलाबी बोंड अळी, रस शोषणाऱ्या किडींचा अल्प प्रमाणात प्रादुर्भाव आढळून येत आहे.

## नागपूर विभाग खरीप हंगाम

- **हवामान** : अहवाल कालावधीत बहुतांश ठिकाणी आकाश ढगाळ होते. विभागात बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली आहे.
- **पिक पेरणी :** विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र १९.१५ लाख हेक्टर असून, दि.१२ ऑगस्ट, २०२४ अखेर १७.६६ लाख हेक्टर क्षेत्रावर (९२%) पेरणी झाली आहे.
- **पिक परिस्थिती :**
  - भात पिकाच्या पुर्नलागवडीची कामे प्रगतीपथावर आहेत.
  - पुर्नलागवड झालेले भात पिक वाढीच्या ते फुटवे फुटणेच्या अवस्थेत आहे.
  - सोयाबीन, तूर, कापूस पिकांच्या पेरणीची कामे पुर्ण झाली आहेत.
  - सोयाबीन पिक शाखीय वाढ ते फुलोरा अवस्थेत आहे.
  - ज्वारी पिक फुटवे फुटणेच्या अवस्थेत आहे.
  - कापूस पिक वाढीच्या अवस्थेत आहे.
  - तूर पिक वाढीच्या अवस्थेत आहे.
  - पिकांमध्ये आंतरमशागतीची कामे सुरु आहेत.
  - मागील आठवडयातील अतिवृष्टीमुळे काही ठिकाणी शेत पिकांचे नुकसान झाले आहे.

- **किड व रोग :**

  विभागात काही ठिकाणी भात पिकावर निळे भुंगेरे, कापूस पिकावर मावा तुडतुडे, सोयाबीन पिकावर तंबाखुवरील पाने खाणारी अळी, उंट अळीचा अल्प प्रमाणात प्रादुर्भाव आढळून येत आहे.

- **प्रधानमंत्री पिक विमा योजना (खरीप-२०२४)** (दि.०१.०८.२०२४ अखेर) **:**
  - **शेतकरी सहभाग संख्या : १६७.८० लाख**
  - **विमा संरक्षित क्षेत्र : ११२.१५ लाख हे.**

# महाराष्ट्र राज्यातील खरीप हंगाम २०२४-२५ मधील मुख्य पिकाखालील दि.१२.०८.२०२४ अखेरचा पिक पेरणी अहवाल

(क्षेत्र हेक्टरमध्ये)

| अ.क्र. | पिके | पाच वर्षाचे सरासरी क्षेत्र (२०१६-१७ ते २०२०-२१) | मागील वर्षाची दि.१४.०८.२०२३ रोजीची पेरणी | सन २०२४-२५ मधील दि.१२.०८.२०२४ अखेर प्रत्यक्ष पेरणी | पेरलेल्या क्षेत्राची पाच वर्षाच्या सरासरी क्षेत्राशी टक्केवारी (२०१६-१७ ते २०२०-२१) | प्रत्यक्ष पेरलेल्या क्षेत्राची मागिल वर्षाच्या क्षेत्राशी टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | स्तंभ ५ ची स्तंभ ३ च्या तुलनेत % | स्तंभ ५ ची स्तंभ ४ च्या तुलनेत % |
| १ | भात | १५०८३७४ | १३५६००३ | १३३०४६० | ८८ | ९८ |
| २ | खरीप ज्वारी | २८८६१५ | ११२२१९ | १०६२५९ | ३७ | ९५ |
| ३ | बाजरी | ६६९०८९ | ३५५७५४ | ३९९०९३ | ६० | ११२ |
| ४ | रागी | ७८१४९ | ६५३१८ | ६५३५० | ८४ | १०० |
| ५ | मका | ८८५६०८ | ८७०९४९ | ११०६५१७ | १२५ | १२७ |
| ६ | इतर तृणधान्य (राजगिरा, कोडू/कोद्रा, कुटकी, वरई, बार्टी, सावा, राळा, इतर) | ४०४४५ | ३९६५४ | ३०३५१ | ७५ | ७७ |
| | **एकूण तृणधान्य** | **३४७०२७९** | **२७९९८९७** | **३०३८०३१** | **८८** | **१०९** |
| ७ | तूर | १२९५५१६ | ११०४४४७ | १२१०९०५ | ९३ | ११० |
| ८ | मुग | ३९३९५७ | १७३३४७ | २३०४४७ | ५८ | १३३ |
| ९ | उडीद | ३७०२५२ | २४६०३८ | ३७१५१९ | १०० | १५१ |
| १० | इतर कडधान्य (कुळीथ, चवळी, मटकी, राजमा, इतर) | ७८८४५ | ५८१३९ | ६८२४८ | ८७ | ११७ |
| | **एकूण कडधान्य** | **२१३८५७१** | **१५८१९७१** | **१८८१११९** | **८८** | **११९** |
| | **एकूण अन्नधान्य** | **५६०८८५०** | **४३८१८६८** | **४९१९१५०** | **८८** | **११२** |
| ११ | भुईमुग | १९१५७५ | १३५९४३ | १४४६८३ | ७६ | १०६ |
| १२ | तीळ | १५१६२ | ४४०४ | ७७१६ | ५१ | १७५ |
| १३ | कारळ | १२४६० | ५९३१ | ३१०३ | २५ | ५२ |
| १४ | सुर्यफुल | १३७८० | २४१२ | ९५७५ | ६९ | ३९७ |
| १५ | सोयाबीन | ४१४९९१२ | ४९२८४७७ | ५०२६४९७ | १२१ | १०२ |
| १६ | इतर गळीतधान्य (एरंडी, इतर) | ९४५२ | ३४९१ | २०६४ | २२ | ५९ |
| | **एकूण तेलबिया** | **४३९२३४०** | **५०८०६५७** | **५१९३६३८** | **११८** | **१०२** |
| **१७** | **कापूस** | **४२०११२८** | **४१७०३२६** | **४०८२३६४** | **९७** | **९८** |
| | **एकूण पेरणी क्षेत्र (ऊस वगळून)** | **१४२०२३१८** | **१३६३२८५१** | **१४१९५१५२** | **१००** | **१०४** |
| **१८** | **उस (लागवडीचा)** | **१०९५०७५** | **२४२०२८** | **१६९५७२** | **१५** | **७०** |
| | **एकूण पेरणी क्षेत्र (ऊसासह)** | **१५२९७३९४** | **१३८७४८७९** | **१४३६४७२४** | **९४** | **१०४** |

टिप - पेरणी क्षेत्र नजर अंदाजित.